MHSO100013472023

**नि.दि.दा.क्र.६१०/२०२३ मधील निशाणी क्र.६४ खालील आदेश.**

प्रतिवादी क्र. ६ व १३ यांनी सदरचा अर्ज त्यांच्याविरुध्द नि.क्र.५५ च्या अर्जावर जो विना म्हणणेचा आदेश झाला आहे तो रद्द होऊन मिळण्यासाठी व त्यांचा जबाब दाखल करुन घेण्यासाठी केलेला आहे. प्रतिवादी क्र. ६ व १३ यांनी सदरच्या अर्जात कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. ६ हा वयस्कर असून त्याला अपघातामध्ये पायास गंभीर दुखापत झाली होती. तसेच प्रतिवादी क्र. १३ हा प्रतिवादी क्र. ६ चा मुलगा असल्यामुळे त्याला प्रतिवादी क्र. ६ च्या उपचारासाठी थांबावे लागले होते. त्यामुळे त्यांना नि. क्र. ५५ च्या अर्जास म्हणणे देता आले नाही. सदरचे अर्जास प्रतिवादींनी म्हणणे दाखल न केल्यामुळे ता.११.१२.२०२४ रोजी न्यायालयाने त्यांच्याविरुध्द विना म्हणणेचा आदेश पारित केला आहे. सदरचा विलंब त्यांनी जाणीवपुर्वक केलेला नाही. म्हणून त्यांनी त्यांचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरचे अर्जास वादींनी जबाब दिलेला असून त्यामध्ये त्यांनी प्रतिवादींच्या अर्जातील सर्व कथन नाकारले आहे. त्यांनी पुढे म्हटले आहे की प्रतिवादींनी जबाब न दाखल करण्याचे संयुक्तीक कारण दिले नाही. म्हणून सदरचा अर्ज मंजूर करण्यास त्यांनी हरकत घेतली आहे व सदरचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

३. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयावर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | विना जबाब आदेश रद्द करणे आवश्यक आहे काय? | ..... होय. |
| २. | आदेश काय? | .... अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र.१ बाबतः–

४. मी प्रतिवादी क्र. ६ व १३ तर्फे विद्वान वकील श्रीमती गाडे व वादींतर्फे विद्वान वकील श्री.पिसाळ यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदरच्या प्रकरणांमधील संबधीत दस्तऐवज पाहिले. वादींनी नि.क्र.५५ चा अर्ज हा ता.१६.०३.२०२४ रोजी दाखल केला आहे. सदरचे अर्जास प्रतिवादी क्र. ६ व १३ यांनी म्हणणे दाखल न केल्यामुळे ता.११.१२.२०२४ रोजी न्यायालयाने त्यांच्याविरुध्द सदरच्या अर्जाचे कामकाज विना म्हणणे चालविणेबाबतचा आदेश पारित केला आहे. त्यानंतर ता.१८.०३.२०२५ रोजी प्रतिवादी क्र. ६ व १३ यांनी सदरचा अर्ज दिलेला आहे व अर्जासोबत त्यांचे म्हणणे दाखल केले आहे.

सदरचे नि.क्र.५५ चे अर्जाचे कायमचे निराकरन करण्यासाठी व प्रतिवादी क्र. ६ व १३ यांना त्यांची बाजू मांडणेसाठी संधी देणेसाठी त्यांच्याविरूद्ध झालेला विना जबाब आदेश रद्द करुन त्यांचे लेखी म्हणणे दाखल करण्यास परवानगी देणे न्यायाच्या हितार्थ आवश्यक आहे. प्रतिवादी क्र. ६ व १३ यांना जर सदरची संधी देण्यात आली नाही तर त्यांना न्याय नाकारलेसारखे होईल. तसेच दोन्ही पक्षकारांचा पूर्ण पुरावा न्यायालयासमोर आला तर न्यायालयाला योग्य न्यायनिवाडा करणे सोयीचे होईल. त्यामुळे प्रतिवादी क्र. ६ व १३ यांच्या विरूद्ध झालेला विना जबाब हा आदेश रद्द करणे व त्यांचा जबाब दाखल करण्यास परवानगी देणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ बाबतः–**

५. मी वर नमुद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.२ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

सदरचा निशाणी क्र.६४ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by
GHANWAT SOPAN
DASHRATH
Date: 2025.10.10
11:55:59 +0530

ता.०८.१०.२०२५

(सो.द.घनवट)
दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,
माळशिरस.

**नि.दि.दा.क्र.६१०/२०२३ मधील**
**निशाणी क्र.६४ खालील आदेश**

**शेरा**

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नाव – श्री.म.पां.सदाफुले.

कोर्टाचे नाव – दि. न्या. व. स्तर, माळशिरस.

न्यायनिर्णयाचा मजकूर सांगितल्याचा दि.०८.१०.२०२५.

न्यायनिर्णय टंकलिखित केलेला दि.०८.१०.२०२५.

न्यायनिर्णय स्वाक्षरीत केल्याचा दि.०८.१०.२०२५.

न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दि.०८.१०.२०२५.

स्वाक्षरीत/–

दि.०८.१०.२०२५.

(श्री.म.पां.सदाफुले)
लघुलेखक ग्रेड – २,
दिवाणी न्यायालय, व. स्तर, माळशिरस.